पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८.

मा.स्थायी समिती

**कार्यपत्रिका क्रमांक - २३२**

**(सभावृत्तांत)**

दिनांक - १२/०७/२०१६ वेळ – दुपारी २.३० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा मंगळवार दिनांक १२/०७/२०१६ रोजी दुपारी २.३० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा.आसवाणी हिरानंद ऊर्फ डब्बू किमतराम - सभापती
२) मा.सौ.साळुंके सविता सुरेश
३) मा.तापकीर अनिता मच्छिंद्र
४) मा.कैलासभाऊ गबाजी थोपटे
५) मा.जालिंदर (बाप्पु) शिंदे
६) मा.काळे विमल रमेश
७) मा.अप्पा उर्फ संपत ज्ञानोबा पवार
८) मा.आल्हाट धनंजय मुरलीधर
९) मा.बहिरवाडे नारायण सदाशिव
१०) मा.सौ.पानसरे अमिना महंम्मद
११) मा.काटे रोहितअप्पा सुदाम
१२) मा.अॅड.संदीप गुलाब चिंचवडे
१३) मा.नेटके सुमन राजेंद्र
१४) मा.लोंढे शुभांगी संतोष
१५) मा.जवळकर वैशाली राहुल

याशिवाय मा.दिनेश वाघमारे-आयुक्त, मा.उल्हास जगताप-नगरसचिव, मा.तळदेकर-मुख्य लेखापरिक्षक, मा.चव्हाण-प्र.शहर अभियंता, मा.डॉ.अनिल रॉय - आरोग्य वैद्यकीय अधिकारी, मा.ठाकुर-उपसंचालक नगररचना, मा.लांडे-मुख्य लेखापाल, मा.गावडे-सह आयुक्त, मा.पाटील, मा.दुधेकर, मा.तुपे-सह शहर अभियंता, मा.सुरगुडे - विकास अभियंता, मा.डोईफोडे, मा.गायकवाड, मा.माने, मा.खोसे, मा.दंडवते, मा.माछरे, मा.दुरगुडे, मा.इंदलकर, मा.आष्टीकर, मा.लोणकर - सहाय्यक आयुक्त, मा.पवार-कायदा सल्लागार, मा.पोमण-मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी, मा.निकम, मा.सवणे, मा.इंगळे, मा.तांबे, मा.थोरात, मा.पठाण, मा.कुलकर्णी, मा.पिरजादे, मा.बरशेट्टी, मा.जुंधारे, मा.घोडे, मा.कांबळे, मा.औंभासे, मा.गट्टुवार, मा.शेख, मा.गायकवाड,

मा.भोसले, मा.मोरे-कार्यकारी अभियंता, मा.डॉ.गोरे-पशुवैद्यकीय अधिकारी, मा.बुरसे-मुख्य अभियंता पीएमपीएमएल, मा.बोदडे-प्रशासन अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

--------

**<u>उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करून घेणेत आले –</u>**

विषय क्र.३१) मिळकत कर संगणक प्रणाली अद्ययावत करणेबाबत.

विषय क्र.३२) Cap Amoxycillin 500mg+ Clavulanic 125mg निविदेद्वारे खरेदी करणेबाबत.

विषय क्र.३३) सन २०१६-१७ च्या अर्थसंकल्पातील ड क्षेत्रिय कार्यालयातील कामांच्या तरतुदीमध्ये फेरबदल करणेबाबत- मा.सविता साळुंके, मा.अनिता तापकीर यांचा प्रस्ताव.

विषय क्र.३४) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या जून्या हद्दीचे मंजूर योजनेत पिंपरी कॅम्प येथील बॅरॅक्स दाटवस्ती म्हणून दर्शविणेबाबत- मा.हिरानंद आसवाणी, मा. रोहितअप्पा काटे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.३५) सन २०१६-१७ च्या अर्थसंकल्पातील फ क्षेत्रिय कार्यालयातील कामांच्या तरतुदीमध्ये फेरबदल करणेबाबत- मा.सविता साळुंके, मा.अनिता तापकीर यांचा प्रस्ताव.

विषय क्र.३६) मे.स्तुप कन्सल्टंट यांना प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून नेमणेबाबत- मा. सविता साळुंके, मा.अनिता तापकीर यांचा प्रस्ताव.

विषय क्र.३७) मे. किरण इंजिनिअरींग सोल्यूशन यांना प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून नेमणेबाबत- मा. सविता साळुंके, मा.अनिता तापकीर यांचा प्रस्ताव.

विषय क्र.३८) मे. सृजन रिर्सच अँण्ड प्लॅनिंग फाऊंडेशन वास्तुविशारद नेमणेबाबत- मा. सविता साळुंके, मा. अनिता तापकीर यांचा प्रस्ताव.

विषय क्र.३९) सन २०१६-१७ च्या अर्थसंकल्पातील तरतुदीमध्ये फेरबदल करणेबाबत- मा. सविता साळुंके, मा. अनिता तापकीर यांचा प्रस्ताव.

विषय क्र.४०) वार्ड क्र. ५५ रहाटणी, पिंपळे सौदागर येथे शेलारवस्ती, पवनानगर, रहाटणी गावठाणामध्ये जलनि:सारण नलिकांचे सुधारणा कामे करणेचे सुधारीत खर्चास मान्यता- मा. सविता साळुंके, मा. अनिता तापकीर यांचा प्रस्ताव.

विषय क्र.४१) दि. ७ ऑगस्ट रोजी निसर्गकवी बहिणाबाई चौधरी सर्पोद्यानात नागपंचमी साजरी करणेबाबत- मा.सविता साळुंके, मा.अनिता तापकीर यांचा प्रस्ताव.

विषय क्र.४२) नगरसदस्यांच्या वाहनावर स्टीकर लावणेबाबत - मा.जालिदंर शिंदे, मा.विमल काळे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.४३) सन २०१६-१७ चे अंदाजपत्रक तरतुद वर्ग करणेबाबत- मा.विमल काळे, मा.वैशाली जवळकर यांचा प्रस्ताव.

----------

दिनांक ५/०७/२०१६ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक २३१) चा सभावृतांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

ठराव क्रमांक – १६६७८ विषय क्रमांक – १

दिनांक – १२/०७/२०१६ विभाग- झोनिपु स्थापत्य

सुचक – मा.अमिना पानसरे अनुमोदक–मा.अनिता तापकीर

संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.झोनिपु/स्था/नि/कावि/५८४/२०१६ दि.१०/०६/२०१६

विषय:-प्रभाग क्र.३७ महात्मा फुलेनगर झोपडपट्टी येथे पुरुषासाठी शहाजी गायकवाड यांच्या घराशेजारी २६ सिट्सचे शौचालय बांधणेबाबत.

विषय क्रमांक १ चा विचार पुढील सभेच्या वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक – १६६७९ विषय क्रमांक – २

दिनांक – १२/०७/२०१६ विभाग- झोनिपु स्थापत्य

सुचक – मा.अमिना पानसरे अनुमोदक–मा.अनिता तापकीर

संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.झोनिपु/स्था/नि/कावि/५८५/२०१६ दि.१०/०६/२०१६

विषय:-प्रभाग क्र.३७ महात्मा फुलेनगर झोपडपट्टीतील संडास ब्लॉक नं.२ (४ सिट्स) पाडून १६ सिट्सचे शौचालय बांधणेबाबत.

विषय क्रमांक २ चा विचार पुढील सभेच्या वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक – १६६८० विषय क्रमांक – ३

दिनांक – १२/०७/२०१६ विभाग- मध्यवर्ती साहित्य भांडार (वैद्य)

सुचक – मा.संदीप चिंचवडे अनुमोदक–मा.नारायण बहिरवाडे

संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.मसभां/४/कावि/१६१/१६ दि.२०/०६/२०१६

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेऊन –

पिंपरी चिंचवड मनपाच्या वैद्यकीय विभागांतर्गत राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजने अंतर्गत वाय.सी.एम.रुग्णालयातील अस्थिरोग विभागासाठी लागणारे इम्प्लान्ट खरेदीबाबत प्रसिध्द केलेल्या ई-निविदा क्र.३/२०१५-१६ मधील लघुत्तम निविदाधारक मे.कोठारी मेडिकल्स यांच्या 283 बाबींकरीता येणा-या र.रु.39,57,532/25, मे.आकाश मेडिकेअर यांच्या 35 बाबींकरीता येणा-या र.रु.6,88,925/-, मे.प्राईम सर्जिकल्स अँन्ड फार्मा. यांच्या 25 बाबींकरीता येणा-या र.रु. 1,98,070/-, मे.डिव्हाईन एन्टरप्रायजेस यांच्या 52 बाबींकरीता येणा-या र.रु.5,73,030/-, मे.ऑटोकॅल यांच्या एका बाबीकरीता येणा-या र.रु.600/- मे. झेनेसिस मेडिकेअर यांच्या 2

बाबीकरीता येणा-या र.रु. 64,850/-, मे.आकाश मेडिकेअर व मे.प्राईम सर्जिकल (समान दर) यांच्या एका बाबीकरीता येणा-या र.रु.5,000/- व मे.कोठारी मेडिकल व मे.डिव्हाईन एन्टरप्रायजेस (समान दर) यांच्या 4 बाबींकरीता येणा-या र.रु.20,400/- व मे.कोठारी मेडिकल व मे.प्राईम सर्जिकल (समान दर) यांच्या एका बाबीकरीता येणा-या र.रु.5,550/- व मे.कोठारी मेडिकल व मे.आकाश मेडिकेअर (समान दर) यांच्या 3 बाबी करीता येणा-या र.रु.40,500/- याप्रमाणे प्राप्त झालेल्या दरांना एक वर्ष कालावधीसाठी मान्यता घेऊन करारनामा करुन खरेदी करणेकामी येणा-या एकूण र.रु. 55,54,457/25 (अक्षरी र.रु. पंचावन्न लाख चोपन्न हजार चारशे सत्तावन्न पैसे पंचवीस फक्त) रकमेच्या खर्चास व एक वर्ष कालावधीत शस्त्रक्रियेसाठी आवश्यकतेनुसार मंजुर दरानुसार खरेदी करणेस मान्यता देणेची मा.आयुक्त यांची मागणी असली तरी सदर निविदेनुसार फक्त र.रु.५६,००,०००/- (अक्षरी र.रु.छप्पन लाख) पर्यंतच खरेदी करण्यास मान्यता देण्यात येत आहे. अतिरिक्त खर्चास वेळोवेळी मा.स्थायी समितीची मान्यता घेऊन खरेदी करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक – १६६८१ | विषय क्रमांक – ४
दिनांक – १२/०७/२०१६ | विभाग- वायसीएमएच
सुचक – मा.अमिना पानसरे | अनुमोदक–मा.अनिता तापकीर

संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.YCMH/भांडार/२/कावि/१५७/२०१६ दि.२३/०६/२०१६

विषय:-पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयाच्या ओटी विभागातील MAQUET कंपनीच्या ०२ नग Operation Table (Sr.No.00672, 00678) ची दुरुस्ती करणेबाबत.

विषय क्रमांक ४ चा विचार पुढील सभेच्या वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक – १६६८२ | विषय क्रमांक – ५
दिनांक – १२/०७/२०१६ | विभाग- उद्यान / वृक्षसंवर्धन
सुचक – मा.अमिना पानसरे | अनुमोदक–मा.अनिता तापकीर

संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.उद्यान/४/कावि/३०३/२०१६ दि.२९/०७/२०१६

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

दिघी गायरान गट क्र.७७ येथे १०,००० वृक्षारोपण करणे व त्याची ३ वर्षे देखभाल करणेचे कामास येणारे प्रति वृक्ष ६१०/- प्रमाणे येणारे र.रू.६१,००,०००/- खर्चास मा.स्थायी समिती ठराव क्र.१३३०८ दि.१०/११/२०१५ अन्वये मान्यता मिळालेली असुन सदर वृक्षारोपण दिघी गायराण ऐवजी जागा बदल करून सी.एम.ई.दापोडी हद्दीतील सी.ई.डी.यु.२६२ येथे १०,००० वृक्षारोपण करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक – १६६८३ विषय क्रमांक – ६

दिनांक – १२/०७/२०१६ विभाग- मध्यवर्ती साहित्य भांडार (वैद्य)

सुचक – मा.वैशाली जवळकर अनुमोदक-मा.विमल काळे

संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.मसाभां/कावि/३३५/२०१६ दि.२८/६/२०१६

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या वैद्यकिय विभागाअंतर्गत राष्ट्रीय कार्यक्रमांची प्रभावीपणे अंमलबजावणी करणेकामी आवश्यक लागणा-या 3 ते 5 वर्षाचे आतिल टुरिस्ट परमिट (पिवळे नंबरप्लेट) असलेल्या 11 टाटा सुमो अथवा तत्सम वाहने (6+1) भाडे तत्वावर घेणेकामी प्रसिध्द करणेत आलेल्या ई-निविदा क्र.15/2015-16 मधील लघुत्तम दर निविदाधारक मे.ओम एंटरप्रायझेस यांचे प्राप्त दर, प्रतिवाहन प्रतिदिन 60 किमीसाठी र.रु.1500/- प्रमाणे व प्रति 60 किमी पुढील अंतरासाठी र.रू.8.50/- दर या प्रमाणे एकूण र.रू.99,00,000/- खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक – १६६८४ विषय क्रमांक – ७

दिनांक – १२/०७/२०१६ विभाग- सुरक्षा

सुचक – मा.वैशाली जवळकर अनुमोदक-मा.विमल काळे

संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.सुवि/०३/कावि/६०१/२०१६ दि.०१/०७/२०१६

विषय:-मनपाच्या विविध मिळकती/ उदा. करसंकलन विभागीय कार्यालय, पाणी पुरवठा, कार्यशाळा इ.ठिकाणी सुरक्षा व्यवस्थेचे काम ठेकेदारी पध्दतीने रखवालदार मदतणीस कर्मचारी पुरविणेबाबत.

विषय क्रमांक ७ चा विचार पुढील सभेच्या वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक – १६६८५ विषय क्रमांक – ८

दिनांक – १२/०७/२०१६ विभाग- मुख्य लेखा परिक्षण

सुचक – मा.वैशाली जवळकर अनुमोदक-मा.विमल काळे

संदर्भ:-मा.मुख्य लेखा परिक्षक यांचे जावक क्र.मुलेप/६/कावि/९३/२०१६ दि.०१/०७/२०१६

मा.मुख्य लेखा परिक्षक यांनी शिफारस केलेप्रमाणे –

महाराष्ट्र महापालिका अधिनियम मधील कलम १०५(१) अन्वये लेखा परिक्षण विभागातील दि.०६.०६.२०१६ ते दि.१२.०६.२०१६ अखेर संपणा-या आठवडयाचा मा.मुख्य लेखा परिक्षक यांनी क्र.मुलेप/६/कावि/९३/२०१६. दि.०१.०७.२०१६ अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक – १६६८६ विषय क्रमांक – ९
दिनांक – १२/०७/२०१६ विभाग- मुख्य लेखा परिक्षण
सुचक – मा.वैशाली जवळकर अनुमोदक-मा.विमल काळे
संदर्भ:-मा.मुख्य लेखा परिक्षक यांचे जावक क्र.मुलेप/६/कावि/९२/२०१६ दि.०१/०७/२०१६

मा.मुख्य लेखा परिक्षक यांनी शिफारस केलेप्रमाणे –

महाराष्ट्र महापालिका अधिनियम मधील कलम १०५(१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.३०.०५.२०१६ ते दि.०५.०६.२०१६ अखेर संपणा-या आठवडयाचा मा.मुख्य लेखा परिक्षक यांनी क्र.मुलेप/६/कावि/९२/२०१६ दि.०१.०७.२०१६ अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक – १६६८७ विषय क्रमांक – १०
दिनांक – १२/०७/२०१६ विभाग- मुख्य लेखा परिक्षण
सुचक – मा.अमिना पानसरे अनुमोदक–मा.अनिता तापकीर
संदर्भ:-मा.मुख्य लेखा परिक्षक यांचे जावक क्र.मुलेप/६/कावि/९१/२०१६ दि.०१/०७/२०१६

मा.मुख्य लेखा परिक्षक यांनी शिफारस केलेप्रमाणे –

महाराष्ट्र महापालिका अधिनियम मधील कलम १०५(१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.२३.०५.२०१६ ते दि.२९.०५.२०१६ अखेर संपणा-या आठवडयाचा मा.मुख्य लेखा परिक्षक यांनी क्र.मुलेप/६/कावि/९१/२०१६ दि.०१.०७.२०१६ अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक – १६६८८ विषय क्रमांक – ११
दिनांक – १२/०७/२०१६ विभाग- मुख्य लेखा परिक्षण
सुचक – मा.अमिना पानसरे अनुमोदक–मा.अनिता तापकीर
संदर्भ:-मा.मुख्य लेखा परिक्षक यांचे जावक क्र.मुलेप/६/कावि/९४/२०१६ दि.०१/०७/२०१६

मा.मुख्य लेखा परिक्षक यांनी शिफारस केलेप्रमाणे –

महाराष्ट्र महापालिका अधिनियम मधील कलम १०५ (१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.१३.०६.२०१६ ते दि.१९.०६.२०१६ अखेर संपणा-या आठवडयाचा मा.मुख्य लेखा परिक्षक यांनी क्र.मुलेप/६/कावि/९४/२०१६ दि.०१.०७.२०१६ अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक – १६६८९ विषय क्रमांक – १२
दिनांक – १२/०७/२०१६ विभाग- पर्यावरण अभियांत्रिकी
सुचक – मा.अमिना पानसरे अनुमोदक–मा.अनिता तापकीर
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.पअका/१/कावि/३५४/२०१६ दि.५/७/२०१६

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पर्यावरण अभियांत्रिकी विभागाकडील नि.नो.क्र.मुख्यालय/११/७/२०१५-१६ मधील आकुर्डी येथील मैलाशुध्दीकरण केंद्राचे देखभाल व दुरुस्तीचे कामे करणे या कामासाठी मे.एच.एन.बी. इंजिनियर्स प्रा.लि. यांचेकडुन नि.र.रु.२,६८,१५,४४०/- (अक्षरी र.रु. दोन कोटी अड्डसष्ठ लाख पंधरा हजार चारशे चाळीस फक्त) पेक्षा -५.५२% कमी या दराने करुन घेवून यांचेसोबत करारनामा करुन कामाचे आदेश देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक – १६६९० विषय क्रमांक – १३
दिनांक – १२/०७/२०१६ विभाग- पर्यावरण अभियांत्रिकी
सुचक – मा.अमिना पानसरे अनुमोदक–मा.अनिता तापकीर
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.पअका/१/कावि/३५३/२०१६ दि.५/७/२०१६
विषय:- मोशी कचरा डेपोसाठी नेरी, नागपुर या संस्थेने बफर झोन संबंधी दिलेल्या अहवालामध्ये उपाययोजना राबविणेबाबत.

विषय क्रमांक १३ चा विचार पुढील सभेच्या वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक – १६६९१ विषय क्रमांक – १४
दिनांक – १२/०७/२०१६ विभाग- पाणी पुरवठा
सुचक – मा.अमिना पानसरे अनुमोदक–मा.अनिता तापकीर
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.पापु/६/कावि/९६३/२०१६ दि.०५/०७/२०१६

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या पाणीपुरवठा विभागाच्या नि.नो.क्र. १७/१३/२०१५-१६ मधील अ.क्र.७ अन्वये प्रभाग क्र.१२ अंतर्गत मिलिंदनगर, बौध्दनगर, राहुलनगर, दळवीनगर येथे पाणीपुरवठा सुधारणाकामी डी.आय.पाईप लाईन टाकणे व त्या अनुषंगीक कामे करणे या कामासाठी मे. युनिक ट्रेडर्स निविदा रक्कम रू.४२,०१,६५०/- (अक्षरी र.रू. बेचाळीस लाख एक हजार सहाशे पन्नास फक्त) पेक्षा २५.६६% कमी दराने या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रु.३२,७९,६८२/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरीयलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्याच्याबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक – १६६९२ विषय क्रमांक – १५
दिनांक – १२/०७/२०१६ विभाग- पाणी पुरवठा
सुचक – मा.वैशाली जवळकर अनुमोदक-मा.विमल काळे
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.पापु/६/कावि/९६२/२०१६ दि.०५/०७/२०१६
विषय:-अ प्रभागांतर्गत सन २०१४-१५ साठी पवना नदीमध्ये वरच्या बाजूस अशुद्ध जलउपसा केंद्राच्या जवळ गाळ काढणेबाबत..

विषय क्रमांक १५ चा विचार पुढील सभेच्या वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक – १६६९३ विषय क्रमांक – १६
दिनांक – १२/०७/२०१६ विभाग- मध्यवर्ती भांडार
सुचक – मा.वैशाली जवळकर अनुमोदक-मा.विमल काळे
संदर्भ:-मा.सह आयुक्त यांचे जावक क्र.मभां/७/कावि/५२३/२०१६ दि.०५/०७/२०१६

मा.सह आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मा.आयुक्त यांचे कार्यालयीन कामकाजासाठी आवश्यक ऑल इन वन संगणक संच-०१ नग, ऑल इन वन प्रिंटर-०१ नग व एमएस ऑफिस २०१० प्रोफेशनल-०१ नग आवश्यक संगणक साहित्य खरेदी करणेकामी कोटेशन नोटीस क्र.०८/२०१६-१७ अन्वये लघुत्तम कोटेशनधारक मे.मोनार्च टेक्नॉलॉजी प्रा.लि,पुणे-०४ यांचेकडून आवश्यक संगणक साहित्य खरेदीकामी एकूण र.रू.१,३३,३००/- दर स्विकृत करणेत आले असून करारनामा करणेस व येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक – १६६९४ विषय क्रमांक – १७
दिनांक – १२/०७/२०१६ विभाग- क क्षेत्रीय कार्यालय
सुचक – मा.वैशाली जवळकर अनुमोदक-मा.विमल काळे
संदर्भ:-मा.क्षेत्रीय अधिकारी यांचे जावक क्र.कक्षे/लेखा/नि.क्र./१५/११/२०१६ दि.१२/०१/२०१६
विषय:-प्रभाग क्र.३९ संत तुकाराम मधील मुख्य व अंतर्गत रस्त्याचे डिव्हायडर व कर्ब पेंटींग करणेबाबत.

विषय क्रमांक १७ चा विचार पुढील सभेच्या वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक – १६६९५ विषय क्रमांक – १८

दिनांक – १२/०७/२०१६ विभाग- क क्षेत्रीय कार्यालय

सुचक – मा.वैशाली जवळकर अनुमोदक-मा.विमल काळे

संदर्भ:-मा.क्षेत्रीय अधिकारी यांचे जावक क्र.कक्षे/लेखा/नि.क्र./१५/१५३/२०१६ दि.१८/०६/२०१६

मा.क्षेत्रीय अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे –

क क्षेत्रिय पाणीपूरवठा विभागाकडील निविदा नोटिस क्र.४/१ अन्वये प्रभाग क्र. ६२ या भागातील पाणीपूरवठा व देखभाल दुरूस्ती करणेकामी मे.बरखा एंटरप्रायझेस नि.र.रु.५,५९,७०३/- (अक्षरी र.रु पाच लाख एकोणसाठ हजार सातशे तीन फक्त) पेक्षा ३४.९९% कमी या दराने ठेकेदारास कारारनामा करुन कामाचा आदेश देण्यात आलेले असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक – १६६९६ विषय क्रमांक – १९

दिनांक – १२/०७/२०१६ विभाग- क क्षेत्रीय कार्यालय

सुचक – मा.वैशाली जवळकर अनुमोदक-मा.विमल काळे

संदर्भ:-मा.क्षेत्रीय अधिकारी यांचे जावक क्र.कक्षे/लेखा/नि.क्र./१५/१४९/२०१६ दि.१८/०६/२०१६

मा.क्षेत्रीय अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे –

क क्षेत्रिय पाणीपूरवठा विभागाकडील निविदा नोटिस क्र.४/६ अन्वये प्रभाग क्र. ३९ या भागातील पाणीपूरवठा व देखभाल दुरूस्ती करणेकामी मे.बरखा एंटरप्रायजेस नि.र.रु.५,५९,७०३/- (अक्षरी र.रु. पाच लाख एकोणसाठ हजार सातशे तीन फक्त) पेक्षा 34.99% कमी या दराने ठेकेदारास कारारनामा करुन कामाचा आदेश देण्यात आलेले आसल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक – १६६९७ विषय क्रमांक – २०

दिनांक – १२/०७/२०१६ विभाग- क क्षेत्रीय कार्यालय

सुचक – मा.अमिना पानसरे अनुमोदक–मा.अनिता तापकीर

संदर्भ:-मा.क्षेत्रीय अधिकारी यांचे जावक क्र.कक्षे/लेखा/नि.क्र./१५/१७३/२०१६ दि.१/०७/२०१६

मा.क्षेत्रीय अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे –

क क्षेत्रिय पाणीपूरवठा विभागाकडे निविदा नोटिस क्र.४/२ अन्वये सन २०१५-१६ करिता दापोडी परीसरामध्ये देखभाल दुरूस्तीचे काम करणेकामी मे.बालाजी इंजिनिअर्स नि.र.रु. ५,५९,९०५/- (अक्षरी र.रु. पाच लाख एकोणसाठ हजार नऊशे पाच फक्त) पेक्षा ३०.००% कमी या दराने ठेकेदारास कारारनामा करुन कामाचा आदेश देण्यात आलेले आसल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक – १६६९८ विषय क्रमांक – २१

दिनांक – १२/०७/२०१६ विभाग- क क्षेत्रीय कार्यालय

सुचक – मा.अमिना पानसरे अनुमोदक–मा.अनिता तापकीर

संदर्भ:-मा.क्षेत्रीय अधिकारी यांचे जावक क्र.कक्षे/लेखा/नि.क्र./१५/१०९/२०१६ दि.५/०५/२०१६

विषय:-वा.क्र.६३ कासारवाडी या भागात पाणी पुरवठा देखभाल दुरूस्ती विषयक कामे करणेकामी

विषय क्रमांक २१ चा विचार पुढील सभेच्या वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक – १६६९९ विषय क्रमांक – २२

दिनांक – १२/०७/२०१६ विभाग- क क्षेत्रीय कार्यालय

सुचक – मा.अमिना पानसरे अनुमोदक–मा.अनिता तापकीर

संदर्भ:-मा.क्षेत्रीय अधिकारी यांचे जावक क्र.कक्षे/लेखा/नि.क्र./१५/१५१/२०१६ दि.१८/०६/२०१६

मा.क्षेत्रीय अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे –

क क्षेत्रिय पाणीपूरवठा विभागाकडील निविदा नोटिस क्र.४/१० अन्वये प्रभाग क्र. ४० या भागातील पाणीपूरवठा व देखभाल दुरूस्ती करणेकामी मे.दृष्टी कन्ट्रक्शन नि.र.रु.५,५९,७०३/- (अक्षरी र.रु. पाच लाख एकोणसाठ हजार सातशे तीन फक्त) पेक्षा ३४.९९% कमी दराने या ठेकेदारास कारारनामा करुन कामाचा आदेश देण्यात आलेले असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक – १६७०० विषय क्रमांक – २३

दिनांक – १२/०७/२०१६ विभाग- वैद्यकीय मुख्य कार्यालय

सुचक – मा.अमिना पानसरे अनुमोदक–मा.अनिता तापकीर

संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.वैद्य/३/कावि/५२९/२०१६ दि.५/७/२०१६

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

आकुर्डी रुग्णालयात व तालेरा रुग्णालयात स्त्री रोग तज्ञ पदाची अवश्यकता विचारात घेता डॉ.रन्ना दानप्पा, स्त्रीरोगतज्ञ यांना आकुर्डी रुग्णालयात व डॉ. संदीप भट, स्त्रीरोगतज्ञ यांना तालेरा रुग्णालयात मानसेवी तज्ञ वैद्यकीय अधिकारी पदावर दरमहा एकत्रित र.रु. ५०००/- या मानधनावर आदेशाच्या दिनांकापासून ६ महीने या कालावधीसाठी नेमणुक देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक – १६७०१ | विषय क्रमांक – २४

दिनांक – १२/०७/२०१६ | विभाग- माहिती व तंत्रज्ञान

सुचक – मा.अमिना पानसरे | अनुमोदक–मा.अनिता तापकीर

संदर्भ:-मा.अति.आयुक्त यांचे जावक क्र.मा.तं.वि/९/कावि/४८८/२०१६ दि.५/०७/२०१६

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

वायसीएमएच/सर्व्हर/कावि/१५/२०१६ दि.१८/०२/२०१६ च्या पत्रान्वये रूग्णालया करिता प्रिंटर हेड व रिबन्सची मागणी नोंदवलेली आहे. पत्रामध्ये सद्यस्थितीत ५ कॅश काऊंटर कार्यान्वित असून दोन शिफ्ट मध्ये कामकाज चालु कळविलेले आहे. तसेच प्रत्येक वॉर्ड मध्ये ऑनलाईन बिलिंग सिस्टीम चालु करण्यात आलेली आहे. प्रिंटरची मागणी वाढलेली असले कारणाने प्रिंटर रिबन्सबाबतची मागणी कळविलेले आहे. माहिती व तंत्रज्ञान अधिकारी विभागाकरिता हार्ड डिस्कची आवश्यकता असले कारणाने हार्ड डिस्क खरेदी करणे आवश्यक आहे. त्यानुसार दरपत्रक मागवून होणारा संभाव्य खर्च ८७,८४०/- आहे. त्यानुसार कोटेशन प्रसिध्द करण्यात आलेले होते. त्यानुसार एकूण ०५ कोटेशन प्राप्त झालेली आहेत. सदरची कोटेशन मा.अतिरीक्त आयुक्त यांचे समक्ष उघडणेत आले असता त्यामध्ये मे.एम. के. एंटरप्रायझेसयांचे दर लघुत्तम प्राप्त झालेले आहेत. र.रू.५९,९९२/- सदरचे दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३१.७०% ने कमी आले आहेत. सदरच्या दर स्विकृतीस मा.अतिरिक्त आयुक्त सो.यांनी मान्यता दिलेली आहे. वायसीएम रूग्णालयाकरिता रिबन्स व हार्ड डिस्क खरेदी करणेकामी व त्या कामाकरिता येणा-या र.रू.५९,९९२/- इतक्या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक – १६७०२ | विषय क्रमांक – २५

दिनांक – १२/०७/२०१६ | विभाग- माहिती व जनसंपर्क

सुचक – मा.अमिना पानसरे | अनुमोदक–मा.अनिता तापकीर

संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.माजसं/३/कावि/११०/२०१६ दि.०२/०७/२०१६

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

गणेशोत्सव स्पर्धा २०१५ मध्ये घेण्यात आलेल्या होत्या. भाग घेतलेल्या मंडळातून बक्षीस पात्र मंडळांना प्रशस्ती पत्रके, धनादेश, स्मृतिचिन्हे इ. देवून सन्मानित करण्यासाठी विशेष जाहिर कार्यक्रम दि.०९/०७/२०१६ रोजी मान्यवरांच्या हस्ते करण्यात येणार असून त्यासाठी येणा-या स्मृतिचिन्हे, प्रशस्तीपत्रके, बॅनर, फ्रेमरेन्ट, मान्यवर चहापान, नाष्टा, भोजन इ. साठी थेट पध्दतीने होणा-या र.रु.१,२०,०००/- (अक्षरी र.रु. एक लाख वीस हजार फक्त) खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक – १६७०३ विषय क्रमांक – २६
दिनांक – १२/०७/२०१६ विभाग- मध्यवर्ती साहित्य भांडार (वैद्य)
सुचक – मा.वैशाली जवळकर अनुमोदक-मा.विमल काळे
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.मसाभां/५/कावि/४२५/२०१६ दि.६/०७/२०१६

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाचे वाय.सी.एम. रुग्णालयातील प्रयोगशाळा व रक्तपेढीकरीता तसेच इतर रुग्णालयाकरीता / दवाखान्याकडून आलेल्या मागणीचा विचार करता सदरची बाब तातडीक असल्याने आणि नवीन निविदा अंतिम झालेली नसल्याने मे.माहेश्वरी सेल्स् कार्पोरेशन यांना वाढीव कामाचे आदेश देण्यात आलेले होते. सध्या काढण्यात आलेल्या निविदेची कार्यवाही पूर्ण होवून संबंधिता बरोबर करारनामा करुन कामाचा आदेश निर्गमित करण्यात आलेला आहे. त्यामुळे झालेल्या वाढीव कामाचे र.रु. २०,४६,५५७/- (अक्षरी र.रू. वीस लाख सेहचाळीस हजार पाचशे सत्तावन्न फक्त) खर्चास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक – १६७०४ विषय क्रमांक – २७
दिनांक – १२/०७/२०१६ विभाग- झोनिपु स्थापत्य
सुचक – मा.वैशाली जवळकर अनुमोदक-मा.विमल काळे
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.झोनिपु/स्था/नि/कावि/६१४/२०१६ दि.०२/०७/२०१६
विषय:-प्रभाग क्र.८ दत्तनगर झोपडपट्टीमधील बनसोडे निवास येथील जूने संडास ब्लॉक पाडून २६ सिट्स नविन सूलभ शौचालय बांधणेबाबत.

विषय क्रमांक २७ चा विचार पुढील सभेच्या वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक – १६७०५ विषय क्रमांक – २८
दिनांक – १२/०७/२०१६ विभाग- प्रशासन
सुचक – मा.वैशाली जवळकर अनुमोदक-मा.विमल काळे
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.प्रशा/१८/कावि/७५८/२०१६ दि.०४/७/२०१६

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मा. मुख्यमंत्री महोदय यांच्या समवेत विधानभवन, पुणे येथे दि.१३ मे २०१६ रोजी बैठक झाली सदर बैठकीमध्ये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विविध प्रश्न/विषयाबाबतचे प्रेझेन्टेशन सादर करणेत आले आहे. सदर प्रेझेन्टेशनच्या ५० सेटस मे.सिध्दी कॉपीअर्स अँड स्टुडंट कन्जूमर स्टोअर, पिंपरी-१८ यांच्याकडून तयार करणेत आले आहेत त्या अनुषंगाने मे.सिध्दी कॉपीअर्स अँड स्टुडंट कन्जूमर स्टोअर, पिंपरी-१८ यांना बील र.रु. ३६,६५०/- (अक्षरी र.रु. छत्तीस हजार सहाशे पन्नास फक्त) अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक – १६७०६ विषय क्रमांक – २९
दिनांक – १२/०७/२०१६ विभाग- कायदा
सुचक – मा.वैशाली जवळकर अनुमोदक-मा.विमल काळे
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.कास/६/कावि/३६६/२०१६ दि.०७/०७/२०१६

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मा.जिल्हा न्यायालय शिवाजीनगर कोर्ट पुणे, येथील पिंपरी चिंचवड महानगर पालिकेच्या नावे असलेल्या चेंबर नं. ५२ च्या, सी बिल्डींगचे सन २०१६-२०१७ या वर्षाचा बिल्डींग देखभाल खर्च प्रति चेंबर र.रु.१०,०००/- प्रमाणे महापालिकेच्या हिस्स्याची र.रु.१०,०००/- (अक्षरी र.रु. दहा हजार फक्त) अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक – १६७०७ विषय क्रमांक – ३०
दिनांक – १२/०७/२०१६ विभाग- मध्यवर्ती भांडार
सुचक – मा.वैशाली जवळकर अनुमोदक-मा.विमल काळे
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.मभां/७/कावि/५२९/२०१६ दि.०७/०७/२०१६

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाचे वतीने आयोजीत केलेल्या महिला महोत्सव २०१६ करीता प्रस्तावात नमूद प्रमाणे मानपत्र, मोमेंटोज व बॅजेस तात्काळ मे.महाकाळ अँड कंपनी यांचेकडून थेट पध्दतीने करारनामा न करता खरेदी/बनवून घेणेत आलेले आहेत.त्याकरीता एकूण र.रू.१५,९००/- (अक्षरी र.रू. पंधरा हजार नऊशे फक्त) चे झालेल्या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

**<u>सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले ऐनवेळचे विषय घेणेत आले-</u>**

ठराव क्रमांक – १६७०८ विषय क्रमांक – ३१
दिनांक – १२/०७/२०१६ विभाग – माहिती व तंत्रज्ञान
सुचक – मा.विमल काळे अनुमोदक-मा.वैशाली जवळकर
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.मातंवि/११/कावि/२४२/१६,दि.२८/०६/२०१६

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेऊन –

मे.प्रोबीटी सॉफ्ट प्रा.लि. यांना मनपाच्या मिळकतकर विभागासाठी कार्यान्वित असेलेली संगणक प्रणाली अद्ययावत करणे व संगणक प्राणीलीत विभागासाठी आवश्यक असणारे आवश्यक बदल करणेचे कामकाज दोन वर्षे कालावधीसाठी देण्यास तसेच त्यांचेसोबत कामाचा करारनामा करण्यास व त्यासाठी येणा-या एकुण र.रु.३३,२०,५००/- (अक्षरी र.रू. तेहतीस लाख

वीस हजार पाचशे फक्त) इतक्या अथवा प्रत्यक्ष येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे. तसेच मे. प्रोबीटी सॉफ्टवेअर यांना ते करीत असलेल्या कामाचे बील प्रत्येक महिन्यास त्या त्या वेळी अदा करणेस मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १६७०९ विषय क्रमांक – ३२

दिनांक – १२/०७/२०१६ विभाग – मध्यवर्ती औषध भांडार

सुचक – मा.वैशाली जवळकर अनुमोदक-मा.विमल काळे

संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.मऔभां/१/कावि/१५३/२०१६,दि.०८/०७/२०१६

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मे.कोठारी मेडिकल अँन्ड सर्जिकल, पिंपरी हे करारनामा करत नसलेने व अनामत रक्कम भरत नसल्याने त्यांची बयाणा जप्त करून द्वितीय लघुत्तम निविदा धारक मे. पायल फार्मा पिंपरी हे प्रथम लघुत्तम निविदा दरापेक्षाही कमी रक्कम रूपये ४.९८ प्रमाणे Cap Amoxycillin 500mg + Clavulanic 125mg = १,३०,५००/- गोळ्यांचा पुरवठा करणेस तयार असलेने होणारे रक्कम रूपये ६,४९,८९०/- चे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १६७१० विषय क्रमांक – ३३

दिनांक – १२/०७/२०१६

सुचक – मा.सविता साळुंके अनुमोदक-मा.अनिता तापकीर

संदर्भ:-मा.सविता साळुंके, मा.अनिता तापकीर यांचा प्रस्ताव-

ड क्षेत्रिय कार्यालयामधील सन २०१६-१७ च्या अंदाजपत्रकामध्ये कामाच्या तरतुदीमध्ये प्रस्तावात नमुद प्रमाणे फेरबदल करण्यास मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट र.रु. १,१०,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १६७११ विषय क्रमांक – ३४

दिनांक – १२/०७/२०१६

सुचक – मा.हिरानंद आसवाणी अनुमोदक-मा.रोहितअप्पा काटे

संदर्भ:-मा.हिरानंद उर्फ डब्बु आसवाणी, मा.रोहितअप्पा काटे यांचा प्रस्ताव-

मौजे पिंपरी येथे निर्वासितांची वसाहत सन १९४९ पासुन आस्तित्वात आहे. पिंपरी कॅम्प मधील बॅरॅक्स कमी क्षेत्राच्या अरुंद रुंदीच्या असून येथील बांधकामे दाट घनतेची आहेत. त्यामुळे बॅरॅक्स क्षेत्राचा विकास हा दाटवस्ती सदृश्य स्वरुपाचा आहे. पिंपरी चिंचवड शहराच्या जून्या हद्दीचे मंजूर विकास योजनेत पिंपरी येथील निर्वासितांची वसाहतीमधील बॅरॅक्स दाटवस्ती क्षेत्र म्हणून दर्शविलेल्या नाहीत. विकास नियंत्रण नियमावलीतील बिगर दाटवस्तीचे नियमानुसार बॅरॅक्स क्षेत्र विकसन करणे नियमाप्रमाणे शक्य होत नाही. पिंपरी चिंचवड शहराच्या मंजूर विकास योजनेत

पिंपरी कॅम्पमधील बॅरॅक्स क्षेत्र दाटवस्ती म्हणून दर्शविल्यास दाटवस्तीचे नियमानुसार नागरिकांना बांधकाम परवानगी मिळू शकेल. सबब पिंपरी चिंचवड शहराच्या मंजूर विकास योजनेत पिंपरी कॅम्प मधील बॅरॅक्स क्षेत्र दाटवस्ती म्हणून दर्शविण्याकामी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल करण्यास आणि फेरबदलाची सर्व वैधानिक कार्यवाही पुर्ण करुन फेरबदलाचा प्रस्ताव शासनास मंजुरीसाठी सादर करण्याकामी मा.आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांना प्राधिकृत करण्यास मा.महापालिका सभेची मान्यता घेणेकामी सदर विषयास मान्यता देवून मा. महापालिका सभेच्या मंजूरीस्तव प्रस्तुतचा विषय महाराष्ट्र महापालिका अधिनियमाचे अनुसूचि प्रकरण २ नियम १ (के) अंतर्गत माहे जुलै २०१६ चे मासिक महापालिका सभेत दाखल करुन घेणेची मागणी मा.महापालिकासभेकडे करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १६७१२ विषय क्रमांक – ३५

दिनांक – १२/०७/२०१६

सुचक – मा.सविता साळुंके अनुमोदक-मा.अनिता तापकीर

संदर्भ:-मा.सविता साळुंके, मा.अनिता तापकीर यांचा प्रस्ताव-

फ क्षेत्रिय कार्यालयामध्ये सन २०१६-१७ च्या अंदाजपत्रकामध्ये कामाच्या तरतुदीमध्ये प्रस्तावात नमुद प्रमाणे फेरबदल करण्यास मान्यता देणेत येत आहे.

(वाढ/घट र.रु. ७,००,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १६७१३ विषय क्रमांक – ३६

दिनांक – १२/०७/२०१६

सुचक – मा.सविता साळुंके अनुमोदक-मा.अनिता तापकीर

संदर्भ:-मा.सविता साळुंके, मा.अनिता तापकीर यांचा प्रस्ताव-

भक्ती-शक्ती चौक येथे ग्रेड सेपरेटर व उड्डाणपूल बांधणे या कामाचे नियोजन करणे, आराखडे तयार करणे, अंदाजपत्रक तयार करणे इ. निविदा पूर्व तसेच निविदा पश्चात कार्यवाही करणेकामी अशा प्रकारच्या कामाचा अनुभव असणारे मे. स्तुप कन्सल्टंट यांची प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून नेमणुक करणे आवश्यक आहे. तरी मे. स्तुप कन्सल्टंट यांची प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) म्हणून नेमणुक करणे व मनपाच्या प्रचलित दरानुसार प्रकल्प रक्कमेच्या प्री टेंडर करीता (निविदा पुर्व काम) र.रु. ४,००,०००/- + सॉईल इन्व्हेस्टिगेशनसाठी स्विकृत दरसूची (DSR) + १५ % या दराने व पोस्ट टेंडर करीता ( निविदे नंतरचे काम) प्रकल्प व्यवस्थापनासाठी प्रकल्प रक्कमेच्या १.८० % + ०.५० % प्रुफ चेकिंगकरिता + सेवा कर अशी फी अदा करणेच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १६७१४ विषय क्रमांक – ३७

दिनांक – १२/०७/२०१६

सुचक – मा.सविता साळुंके अनुमोदक-मा.अनिता तापकीर

संदर्भः-मा.सविता साळुंके, मा.अनिता तापकीर यांचा प्रस्ताव-

दापोडी येथे मुंबई-पुणे रस्त्यावर FOB बांधणे व स्थापत्यविषयक अनुषंगिक कामे करणे या कामासाठी मे. किरण इंजिनिअरींग सोल्यूशन यांची प्रकल्प सल्लागार म्हणून नेमणूक करणेस मनपाचे प्रचलित दरानुसार प्रकल्प रकमेच्या प्री टेंडर करीता ०.९०% या दराने व पोस्ट टेंडर करीता प्रकल्प व्यवस्थापनासाठी प्रकल्प रकमेच्या १.४५% अशी एकूण प्रकल्प रकमेच्या २.३५% + सेवा कर फी अदा करणेच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे. मे.किरण इंजिनिअरींग सोल्यूशन यांची प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून नेमणूक करुन त्यांना वरीलप्रमाणे फी + सेवा कर अदा करणेच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १६७१५ विषय क्रमांक – ३८

दिनांक – १२/०७/२०१६

सुचक – मा.सविता साळुंके अनुमोदक-मा.अनिता तापकीर

संदर्भः-मा.सविता साळुंके, मा.अनिता तापकीर यांचा प्रस्ताव-

प्रभाग क्र.२७ मध्ये राजश्री शाहू पुतळ्याजवळ शाहू सृष्टी करणे या कामासाठी मे.श्रुजन रिर्सच अँण्ड प्लॅनिंग फाऊंडेशन यांना या कामाचे आराखडे तयार करणे, अंदाजपत्रक करणे इ. कामासाठी अशा प्रकारच्या कामाचा अनुभव असलेले मे. सृजन रिर्सच अँण्ड प्लॅनिंग फाऊंडेशन यांना सदर कामासाठी वास्तुविशारद यांची नियुक्ती कौन्सिल ऑफ आर्किटेकच्या नियमावलीनुसार फी अदा करणेचे प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १६७१६ विषय क्रमांक – ३९

दिनांक – १२/०७/२०१६

सुचक – मा.सविता साळुंके अनुमोदक-मा.अनिता तापकीर

संदर्भः-मा.सविता साळुंके, मा.अनिता तापकीर यांचा प्रस्ताव-

मा.स्थायी समिती ठराव क्र.१६६५०, दिनांक ५/७/२०१६ रद्द करण्यात येवुन पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सन २०१६-१७ या आर्थिक वर्षामध्ये प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे तरतुद वर्गीकरणास मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट र.रु. २७,९८,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १६७१७ विषय क्रमांक – ४०

दिनांक – १२/०७/२०१६

सुचक – मा.सविता साळुंके अनुमोदक-मा.अनिता तापकीर

संदर्भ:-मा.सविता साळुंके, मा.अनिता तापकीर यांचा प्रस्ताव-

वार्ड क्र.५५ रहाटणी, पिंपळे सौदागर येथील शेलारवस्ती, पवनानगर, रहाटणी गावठाणमध्ये जलनि:सारण नलिकांचे सुधारणा कामे करणे ( निविदा नोटीस क्र.४/९-२०१५/१६) या कामाअंतर्गत सद्यस्थितीत ७५% काम पुर्ण झालेले असून अद्याप शेलारवस्ती इत्यादी ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकणेचे काम बाकी असून सदर ठिकाणी जलनि:सारण नलिका टाकणे अत्यावश्यक आहे. सदर कामास र.रू.३४,२६,६९६/- च्या खर्चास ठराव क्र.१२५६६, दि.२९/९/२०१५ चे अन्वये मान्यता मिळालेली आहे. सबब सदर कामासाठी वाढीव खर्च र.रु.६,५२,७०४/- सह सुधारित खर्च र.रु.४०,७९,४००/- यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १६७१८ विषय क्रमांक – ४१

दिनांक – १२/०७/२०१६

सुचक – मा.सविता साळुंके अनुमोदक-मा.अनिता तापकीर

संदर्भ:-मा.सविता साळुंके, मा.अनिता तापकीर यांचा प्रस्ताव-

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या संभाजीनगर प्रभाग क्र.९ मधिल निसर्गकवी बहिणाबाई चौधरी सर्पोद्यानात सालाबादप्रमाणे यावर्षीही नागपंचमी साजरी केली जाणार आहे. गेली २० वर्षे या सणामध्ये महिलांसाठी विशेष कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. तरी या ठरावान्वये नागपंचमी सणासाठी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देण्यात येत आहे. तसेच प्रभाग क्र.३६, ३५ व ४६, ४८, ५६, ६, ४९, ६४, ४०, ६२ या वार्डात नागपंचमी साजरी करण्यास व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता सदरची कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १६७१९ विषय क्रमांक – ४२

दिनांक – १२/०७/२०१६

सुचक – मा.जालिंदर शिंदे अनुमोदक-मा.विमल काळे

संदर्भ:-मा.जालिंदर शिंदे, मा.विमल काळे यांचा प्रस्ताव-

मध्यवर्ती भांडार विभागामार्फत मनपा सदस्य व स्वीकृत सदस्यांचे वाहनावर लावणेसाठी "नगरसदस्य, पिंपरी चिंचवड महानगरपालिका" असे स्टीकर (प्रत्येक सदस्यास दोन प्रमाणे) कोटेशन मागवून खरेदी करण्यास व त्या कामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १६७२०                विषय क्रमांक – ४३

दिनांक – १२/०७/२०१६

सुचक – मा.विमल काळे                अनुमोदक-मा. वैशाली जवळकर

संदर्भ:-मा. विमल काळे, मा.वैशाली जवळकर यांचा प्रस्ताव-

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सन २०१६-१७ चे अंदाजपत्रकामधील प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे तरतूद निविदा काढणेसाठी वर्गीकरण करणेस मान्यता देण्यात येत आहे.

(वाढ/घट र.रु. ३७,३४,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**(आसवाणी हिरानंद ऊर्फ डब्बू किमतराम)**
**सभापती**
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८ नगरसचिव विभाग,
क्रमांक - नस/११/कावि/९९०/२०१६
दिनांक – १४/०७/२०१६



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.